# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २०६-२३** **दिनांक : - ०४/०७/२०२३**

## सोनसाखळी चोरी करणाऱ्या सराईत आरोपीतास शिताफिने अटक करुन ११ गुन्हयांची उकल करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

दिनांक १९/०६/२०२३ रोजी सकाळी ०५.३० वा ते ०६.०० वा. सुमारास फिर्यादी हे आचोळे येथील स्मशानभुमी रोड, ड्रीमलँड हॉटेलच्या मागे, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर येथे वॉकिंग करीत असतांना यातील आरोपीत हे एफ झेड कंपनीची मोटार सायकलवर येवुन त्यापैकी अंगामध्ये ऑरेंज रंगाचा टी शर्ट व तोंडाला मास्क घातलेला अशा वर्णनाचे पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादीच्या गळयातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जबरीने खेचुन ड्रीमलँड हॉटेलकडे भरधाव वेगाने निघुन गेले. त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक १९/०६/२०२३ रोजी आचोळे पोलीस ठाणेत आरोपीतांविरुध्द गुरक्र. ३०९/२०२३ भादविसं कलम ३९२,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यासुमारास माणिकपुर व वालीव परिसरात देखील याचसारखी सोन्याची चैन जबरीचे खेचुन नेलेची घटना घडली होती.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात एकाच दिवशी सलग एकापाठोपाठ एक अशा ०३ चैन चोरीच्या घटना घडल्या. त्यामुळे अशा गुन्हयांना आळा घालणे व घडलेले गुन्हे उघडकीस आणणेबाबत वरिष्ठांनी तात्काळ मार्गदर्शन व सुचना देवून पथके रवाना केली.

त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखाचे अधिकारी व अंमलदार यानी घडणाऱ्या प्रत्येक चैन स्नॅचिंग गुन्हयाचे घटनास्थळी समक्ष भेटी दिल्या व तांर्त्रिक विश्लेषन करुन परिक्षण केले होते. त्याअनुषंगाने गुन्हयातील आरोपी यांचा आंबिवली पर्यंत माग घेण्यात आला. सदर ठिकाणी आरोपीबाबत गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त केली असता आरोपी नामे अली हसन अफसर उर्फ अबु जाफरी, वय २४ वर्ष, राह. गल्ली नं ४, सुपर स्टार बेकरीच्या पाठीमागे, पाटील नगर, आंबवली पश्चिम, कल्याण, जि. ठाणे हा असल्याचे निष्पन्न झाले असता वरिरष्ठांचे मार्गदर्शनाने आंबिवली परिसरात जावून ईराणी वस्तीमध्ये नमुद आरोपीत याचे ठाव ठिकाणाबाबत माहिती काढून स्थानिक पोलीसांच्या मदतीने आरोपीताचे रहात्या घरी सापळा कारवाई केली असता आरोपी घराच्या मागील खिडकीतून उडी मारुन आंबीवली येथील जंगलाच्या दिशेने पळून गेला. त्यावेळी सपोनि दत्तात्रय सरक व पोलीस पथक यांनी सदर आरोपीचा जंगलाच्या दिशेने पाठलाग केला. सदर जंगलात आरोपीचा शोध घेणेसाठी सर्व पोलीस स्टाफ वेगवेगळया दिशेने गेले असता पोहवा/ शिवाजी पाटील यांनी दलदलीत लपलेल्या आरोपीस शिताफिने ताब्यात घेत असताना आरोपी व त्यांच्यात झटापटी झाली त्यावेळी उर्वरीत पोलीस स्टाफच्या मदतीने आरोपीस ताब्यात घेवून नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेले आहे.

नमुद अटक आरोपीत याचेकडे पोलीस कोठडीदरम्यान तपास केला असता आरोपीने जबरी चोरी (चैन स्नॅचिंग) चे ०७ गुन्हे, जबरी चोरी (मोबाईल स्नॅचिंग) चे ०२ गुन्हे व नमुद गुन्हयात चोरी करण्याकरता वापरलेली

मोटार सायकलीसह (वाहन चोरी) चे ०२ गुन्हे असे एकुण ११ गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन गुन्हयात चोरीस गेलेले ७१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ०२ मोबाईल फोन व ०२ मोटार सायकल असा एकुण ५,९०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश आलेले आहे. नमुद दाखल गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. दत्तात्रय सरक करीत आहेत.

:- उघडकीस आलेले गुन्हे :-

| अ क्र | पोलीस ठाणे | गु.रजि.क्र व कलम |
|---|---|---|
| ०१ | आचोळे पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं ३०९/२०२३ भा.द.वि कलम ३९२, ३४ |
| ०२ | माणिकपुर पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं २३०/२०२३ भा.द.वि कलम ३९२, ३४ |
| ०३ | वालीव पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं ५३५/२०२३ भा.द.वि कलम ३९२, ३४ |
| ०४ | पेल्हार पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं ५९४/२०२३ भा.द.वि कलम ३९२, ३४ |
| ०५ | आचोळे पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं २४३/२०२३ भा.द.वि कलम ३९२, ३४ |
| ०६ | काशिमिरा पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं ४७७/२०२३ भा.द.वि कलम ३९२, ३४ |
| ०७ | वालीव पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं. १२१/२०२३ भा.द.वि कलम ३९२, ३४ |
| ०८ | विरार पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं. ८५५/२०२२ भा.द.वि कलम ३९२ |
| ०९ | नयानगर पोलीस स्टेशन | गुन्हा रजि नं ७७/२०२३ भा.द.वि कलम ३९२ |
| १० | कापुरबावडी पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं. ११०/२०२२ भा.द.वि कलम ३७९ |
| ११ | महेसाना शहर, बी डिव्हीजन पोस्टे, गुजरात | गुन्हा रजि नं. ११२०६०४५२३०३४२/२०२३ भा.द.वि.क.३७९ |

नमुद अटक आरोपीत हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द यापुर्वी ठाणे शहर हद्दीत जबरी चोरी व वाहन चोरीचे एकुण ०९ गुन्हे दाखल आहेत. तसेच खालील नमुद गुन्हयात तो पाहिजे आरोपी आहे.

| अ क्र | पोलीस ठाणे | गु.रजि.क्र व कलम |
|---|---|---|
| ०१ | कल्याण तालुका पो स्टे, ठाणे ग्रामीण | गुन्हा रजि नं १९७/२०२३ भा.द.वि कलम ४२०, ३४ |
| ०२ | शिळडायघर पोलीस स्टेशन, ठाणे शहर | गुन्हा रजि नं १६५/२०२३ भा.द.वि कलम ३९२, ३४ |

सदरची कारवाई श्री. अविनाश आंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी अधिकारी पो.नि. राहुल राख, सपोनि/दत्तात्रय सरक, नितीन बेंद्रे, श्रीमंत जेधे, पोहवा/शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे,राजाराम काळे, सतिश जगताप, आसिम मुल्ला, महेश वेल्हे, संग्राम गायकवाड, अनिल नागरे, जयकुमार राठोड, हनुमंत सुर्यवंशी, मनोहर तावरे, सुनिल कुडवे, राजविर संधु, प्रविण पवार तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम- सायबर सेल, मसुब जवान सचिन चौधरी यांनी केलेली आहे.

----0000---